# विद्यार्थ्यांसाठी करिअर कट्टा ॲप

## करिअर कट्टा ॲप वापराबाबत संपूर्ण मार्गदर्शिका

महाराष्ट्र शासन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग

### प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास उपक्रमांतर्गत करिअर कट्टा ॲप हे विद्यार्थ्यांसाठी एक अत्यंत उपयुक्त डिजिटल शिक्षणाचे व्यासपीठ आहे. या ॲपच्या माध्यमातून विद्यार्थी विविध कोर्सेस पूर्ण करून अधिकृत ई-प्रमाणपत्र प्राप्त करू शकतात. खाली दिलेल्या पाच सोप्या टप्प्यांचा उपयोग करून तुम्ही हे ॲप सहजपणे वापरू शकता.

### टप्पा १: ॲप डाउनलोड करा

सर्वप्रथम तुमच्या स्मार्टफोनमध्ये करिअर कट्टा ॲप डाउनलोड करणे आवश्यक आहे.

**Android वापरकर्त्यांसाठी :**

तुमच्या फोनमधील Google Play Store उघडा.
सर्च बारमध्ये 'Career Katta' असे टाइप करा.
अँप दिसल्यावर 'Install' बटणावर क्लिक करा.
डाउनलोड पूर्ण झाल्यावर ॲप आपोआप इन्स्टॉल होईल.

**iPhone / iOS वापरकर्त्यांसाठी :**

तुमच्या फोनमधील App Store उघडा.
सर्च बारमध्ये 'Career Katta' असे टाइप करा.
'Get' बटणावर क्लिक करून ॲप डाउनलोड करा.
महत्वाचे ॲप डाउनलोड करण्यापूर्वी इंटरनेट कनेक्शन व्यवस्थित असल्याची खात्री करा. ॲप पूर्णपणे विनामूल्य आहे.

## टप्पा २ : लॉगिन आणि पासवर्ड

ॲप इन्स्टॉल झाल्यानंतर त्यात लॉगिन करणे आवश्यक आहे.

**लॉगिन कसे करावे :**

ॲप उघडल्यावर लॉगिन पेज दिसेल.
Email ID / Mobile Number च्या जागी महाविद्यालयाने दिलेला Email ID किंवा Mobile Number टाकावा.
Password च्या जागी पहिल्यांदा लॉगिन करताना डीफॉल्ट पासवर्ड १२३४५६७८ टाकावा.
त्यानंतर 'Login' बटणावर क्लिक करा.

**पासवर्ड रिसेट कसा करावा :**

लॉगिन पेजवर 'Reset Password' (Key चिन्ह असलेले) बटणावर क्लिक करा.
तुमचा नोंदणीकृत Email ID किंवा Mobile Number टाकून OTP मागवा.
OTP टाकल्यानंतर नवीन पासवर्ड सेट करा.
नवीन पासवर्ड किमान ८ अक्षरांचा व सुरक्षित ठेवा.
टीप : पहिल्यांदा लॉगिन केल्यानंतर लगेच पासवर्ड बदलण्याची शिफारस केली जाते, जेणेकरून तुमचे खाते सुरक्षित राहील.

## टप्पा ३ कोर्स जॉइन करा

लॉगिन यशस्वी झाल्यानंतर तुम्हाला ऊीहलेरीव दिसेल. येथून तुम्ही कोर्स जॉइन करू शकता.

**कोर्स जॉइन करण्याची प्रक्रिया :**

Dashboard वर गेल्यानंतर 'My Classes' हा पर्याय शोधा.
'My Classes' मध्ये तुमच्यासाठी उपलब्ध असलेले कोर्सेस दिसतील.
ज्या कोर्समध्ये प्रवेश घ्यायचा आहे, त्यावर क्लिक करा.
'Join Course' बटणावर क्लिक केल्यावर तुम्ही त्या कोर्समध्ये नोंदणीकृत व्हाल.
कोर्स जॉइन झाल्याचा संदेश स्क्रीनवर दिसेल.

**Dashboard वर काय दिसते :**

तुम्ही जॉइन केलेले कोर्सेस
प्रत्येक कोर्सची प्रगती (Progress)
Notifications व इतर माहिती
टीप : महाविद्यालयाने तुमच्यासाठी नेमून दिलेले कोर्सेस 'My Classes' मध्ये आधीच दिसत असतात. त्यामुळे योग्य कोर्सच निवडा.

## टप्पा ४ : अभ्यास आणि परीक्षा

कोर्स जॉइन केल्यानंतर आता अभ्यास सुरु करा आणि परीक्षा द्या.

**अभ्यास कसा करावा :**

जॉइन केलेल्या कोर्सवर क्लिक केल्यावर त्यातील व्हिडिओ लेक्चर्स, नोट्स व इतर अभ्यास साहित्य उपलब्ध होईल.
प्रत्येक विषयाचे लेक्चर नीट पाहा व समजून घ्या.
शक्यतो सर्व Module क्रमाने पूर्ण करा.

**परीक्षा कशी द्यावी :**

कोर्सचे किमान ६०% पूर्ण झाल्यानंतरच परीक्षा देण्याची सुविधा उपलब्ध होते.
परीक्षा देण्यासाठी ॲपच्या डाव्या बाजूला वरती असलेल्या ३ आडव्या रेषा (Menu /Hamburger Icon) वर क्लिक करा.
उघडलेल्या चशर्पी मध्ये 'Exam' हा पर्याय निवडा.
Exam सुरू करण्यापूर्वी सूचना नीट वाचा.
सर्व प्रश्नांची उत्तरे द्या आणि 'Submit' करा.
महत्वाचे : परीक्षा देण्यापूर्वी कोर्सचे किमान ६०% पूर्ण असणे बंधनकारक आहे. त्याशिवाय Exam चा पर्याय सक्रिय होणार नाही. त्यामुळे आधी संपूर्ण अभ्यास करा,

## टप्पा ५ : प्रमाणपत्र (e-Certificate) मिळवा

परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण झाल्यानंतर तुम्हाला डिजिटल प्रमाणपत्र (e-Certificate) मिळेल.

**माणपत्र कसे डाउनलोड करावे :**

अँपमध्ये 'Certificate' Tab वर जा.
तुम्ही पूर्ण केलेल्या कोर्सचे प्रमाणपत्र येथे दिसेल.
'Download' बटणावर क्लिक करा.
प्रमाणपत्र तुमच्या फोनमध्ये PDF स्वरूपात सेव्ह होईल.
हे प्रमाणपत्र तुम्ही Print काढू शकता, Email करू शकता किंवा LinkedIn वर शेअर करु शकता.
हे e-Certificate महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास उपक्रमाद्वारे प्रदान केलेले अधिकृत प्रमाणपत्र आहे, जे भविष्यातील नोकरी व उच्च शिक्षणासाठी उपयुक्त ठरते.

**सारांश – एका दृष्टिक्षेपात**

| पायरी | कृती | महत्त्वाचा मुद्दा |
|---|---|---|
| १ | ॲप डाउनलोड करा | Play Store / App Store |
| २ | लॉगिन करा | डीफॉल्ट पासवर्ड: १२३४५६७८ |
| ३ | कोर्स जॉइन करा | My Classes Join Course |
| ४ | अभ्यास व परीक्षा | ६०% पूर्ण केल्यानंतरच Exam |
| ५ | प्रमाणपत्र डाउनलोड करा | Certificate Tab - Download |

## तांत्रिक अडचणी आल्यास काय करावे ?

- ✻ लॉगिन होत नसल्यास महाविद्यालयाच्या संबंधित कार्यालयात संपर्क साधा व Email ID /Mobile Number तपासून घ्या.
- ✻ कोर्स दिसत नसल्यास Dashboard Refresh करा किंवा ॲप बंद करून पुन्हा उघडा.
- ✻ Exam चा पर्याय दिसत नसल्यास कोर्सची प्रगती ६०% पेक्षा जास्त झाली आहे का ते तपासा.
- ✻ Certificate डाउनलोड होत नसल्यास इंटरनेट कनेक्शन तपासा व थोड्या वेळाने पुन्हा प्रयत्न करा.

करिअर कट्टा ॲप वापरून तुमच्या कौशल्यांना नवी दिशा द्या आणि उज्ज्वल भविष्याकडे वाटचाल करा!

★ ★ ★

